# विविध समस्या सोडवण्यासाठी सिडकोला संतोष शेट्टी यांचा आमरण उपोषणाचा इशारा

## प्रश्न मार्गी लावल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही - आमदार प्रशांत ठाकूर

पनवेल (प्रतिनिधी) नविन पनवेल वसाहतीमध्ये अनियमितपणे होणारा पाणीपुरवठा व वेळेवर कचरा न उचलल्याने साचलेल्या ढिगाऱ्यास जबाबदार असणाऱ्या सिडकोच्या विरोधात माजी उपनगराध्यक्ष तथा विद्यमान नगरसेवक संतोष शेट्टी यांनी ऊग्र आंदोलनाचा पवित्रा घेतला असून, २० जुलै पर्यंत या समस्या सोडवण्यात आल्या नाहीत तसेच योग्य उपाय योजना करून निर्णय घेतला नाही तर स्थानिक आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली येत्या २५ जुलै रोजी नविन पनवेल येथील सिडको कार्यालयासमोरील परिसरात संतप्त नागरिक तसेच कार्यकर्ते यांच्यासह आमरण उपोषण करणार असल्याचा इशाराही त्यांनी सिडको व्यवस्थापकीय संचालकांना निवेदनाव्दारे दिला असून या संदर्भातील माहिती नगरसेवक संतोष शेट्टी यांनी नविन पनवेल येथे मंगळवारी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत घेतलेल्या पत्रकार परिषदेत दिली. या पत्रकार परिषदेस नगराध्यक्षा चारूशिला घरत, नगरसेवक प्रकाश बिनेदार, नगरसेविका सिताताई पाटील, मावळ लोकसभा युवक कॉंग्रेसचे अध्यक्ष किशोर चौथमोल, न्यू पनवेल रेसिडेन्ट फोरमचे अध्यक्ष कॅप्टन तलवार सिंग उपस्थित होते.

नविन पनवेल वसाहत ही सिडकोच्या माध्यमातून विकसीत करण्यात आली आहे. येथील नागरिकांकडून सिडको कर वसूल करते त्यामुळे नागरिकांना प्राथमिक गरजा पुरविल्या जाव्यात ही सिडको प्रशासनाची नैतीक जबाबदारी आहे. परंतु वारंवार भेट, चर्चा, बैठका, पत्रव्यवहार, फोनद्वारेही सूचित करून सुद्धा सिडको अधिकारी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करतात असे निदर्शनास आले आहे. कचरा अनियमितपणे उचलला जातो त्यामुळे रस्त्यावर मोठे मोठे कचऱ्याचे ढिगारे जमा होऊन दुर्गंधी पसरते. यामुळे नागरिकांच्या जिवीतास धोका निर्माण झाला आहे. त्या ढिगाऱ्यांचे फोटो काढून व्हॉट्सअॅपच्या माध्यमातून ते फोटो संबंधीत अधिकाऱ्यांना पाठविले आणि यावर त्यांचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. त्याचबरोबर संबंधित अधिकाऱ्यांना कचऱ्याच्या ढिगाऱ्यांच्या बाजूला नेवून त्यांना ती परिस्थिती किती भयावह आहे हे सुद्धा कार्यकर्त्यांनी सिडकोच्या निदर्शनास आणून दिले आहे. अनियमित पाणी पुरवठयामुळे येथील सामान्य माणसाला, रोजगारासाठी बाहेरगावी जाणाऱ्या चाकरमान्याला अनेक समस्यांना तोंड दयावे लागते. समस्या सुटण्याऐवजी परिस्थिती 'जैसै थे' आहे, यावर ठोस अशी उपाय योजना करण्यात सिडको प्रशासन अपयशी ठरले आहे असे दिसते.

नगरसेवक संतोष शेट्टी यांनी माहिती देताना पुढे सांगितले की, स्थानिक प्रतिनिधी या नात्याने वारंवार सिडकोकडे पाणी आणि कचरा या मुलभुत सुविधांबरोबरच विविध प्रश्नांकडे सिडकोने लक्ष दयावे अशी विनंतीही केली आहे. पण सिडकोने याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले आहे. यामूळे २० जुलै पर्यंत येथील सर्वच नागरी सुविधा सुरळीत कराव्यात विशेषतः कचरा आणि पिण्याचे पाणी या दोन गोष्टीमुळे स्थानिक नागरिक त्रस्त आहेत, या महत्त्वपूर्ण बाबींकडे सिडकोने अधिक लक्ष दयावे असेही शेट्टी यांनी म्हटले आहे. सेक्टरनुसार घंटागाडीचे वेळापत्रक बनवावे. सेक्टरच्या प्रत्येक इमारती पर्यंत घंटागाडी पोहचावी जेणेकरून केरकचरा रोडवर फेकला जाणार नाही. हॉटेल, व्यापारी वर्ग आणि खाद्यपदार्थांचे दुकानदार यांच्यासाठी वेगळी कचरा गाडी चालू करण्यात यावी आणि त्यांना कचरा वेळेत देण्यासाठी नियम, अटी व सक्ती करण्यात यावी. रात्री ७ ते ११ घंटागाडी फिरविण्यात यावी जेणेकरून नागरिक आणि व्यापारीवर्ग ह्या दोघानांही सोईचे होईल. घंटागाडीनेच कचरा घेवून जाण्यात यावा. साचलेला कचऱ्याचा ढिगारा जेसीबीने उचलून कॉन्ट्रॅक्टरचे खिसे भरणे सिडकोने थांबवावे. सेक्टर ३ व १३ मधील पाण्याच्या टाक्या सिडकोने तोडल्या परंतु त्यावर दुसरी उपाययोजना केली नाही. ती पर्यायी व्यवस्था लवकरात लवकर करण्यात यावी. एमजेपी कडून पाणी शटडाऊन असताना पाण्याचा मुबलक साठा राहु शकेल अशी व्यवस्था सिडकोकडे उपलब्ध नाही. त्यावरही लवकरात लवकर निर्णय घेवून कारवाई करावी. जलवाहीन्या जुन्या झाल्यामुळे पाण्याचा दाब कमी आहे. ज्या दिवशी पाणीपुरवठा होणार नाही त्यावेळेस प्रत्येक नागरिकांपर्यंत याची सूचना पोहचेल असे संपर्काचे माध्यम सिडकोने उभे करावे. आपात्कालीन परिस्थितीत पाणीपुरवठा करणाऱ्या टॅंकरची मागणी सिडको यांचेकडे केल्यास टॅंकर नाही आहे असे उत्तर मिळते, त्यावरही उपाययोजना कराव्यात. या महत्वपूर्ण सुचना अधोरेखित करून कोणतीही अनपेक्षित घटना घडल्यास त्याला सिडको प्रशासन सर्वोतोपरी जबाबदार राहील असेही शेवटी नगरसेवक संतोष शेट्टी यांनी यावेळी बोलताना आवर्जून नमुद केले.

******सिडकोच्या चालढकलीमुळे नवीन पनवेल वसाहतीत पायाभूत सुविधांचा बोजवारा उडाला आहे. या ठिकाणीची यंत्रना जुनी झाली आहे. पाणी व कचरा यासारख्या मुलभूत सुविधा पुरविण्यासाठी सिडकोला यंत्रणेचे नुतनीकरण करावे लागणार आहे. यासाठी पैसे भरावे लागणार असल्याने प्रशासन या सर्व मागण्यांकडे कानाडोळा करीत आहे. कर्तव्यात कसूर करणाऱ्या हलगर्जी व भ्रष्टाचारी अधिकाऱ्यांवर सिडकोकडून कारवाई झाली पाहिजे. नगरसेवक संतोष शेट्टी यांनी यासंदर्भात वारंवार आवाज उठवला आहे, तरी सुध्दा सिडको जाणिवपूर्वक दुर्लक्ष करीत आहे. शेट्टी यांच्या आंदोलनाला कॉंग्रेस पक्षाचा पूर्णपणे पाठिंबा असून कचरा, पिण्याचे पाणी व इतर असुविधा हे प्रश्न मार्गी लावल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही.**

**-आमदार प्रशांत ठाकूर**